ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
Impact Factor : 2.7286

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

VOLUME I ISSUE IV JAN. TO MARCH 2023



ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM
MUSIC | LIBRARY SCIENCE |

www.powerofknowledge.co.in
E-mail : powerofknowledge3@gmail.com
Editor
Prof.Dr.Sadashiv H. Sarkate

अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृ.क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | "The Evolutionary Journey Of Yoga From The Ancient Times To Traditional Period" | Dr.Archana P. Kolhe | 1-6 |
| 2 | The Influence of Culture on International Marketing | Dr. Govind Pandurang Choudhari | 7-11 |
| 3 | Effect of guided meditation on teachers self esteem | Dr. Prajakta Medhekar | 12-16 |
| 4 | Influence of Population Expansion on Economic Development in India | Mr. Preetesh Dilip Pathare | 17-20 |
| 5 | मराठी दलित कवितेतील स्त्री जीवन : दृष्टीक्षेप | प्रा.संदीप कोरडे | 21-26 |
| 6 | सातपुड्यातील तडवी आदिवासींचे सण–उत्सव आणि जत्रा | मुकेश ए.सावळे | 27-31 |
| 7 | मराठी लघुअनियतकालिकांतील कवितांमधील जाणिव | सौ. कमल दिनेश येऊल | 32-36 |
| 8 | खान्देशात होणाऱ्या रथोत्सवानिमित्त भवानी नृत्य अन्स्वांग लोककलेचा तुलनात्मक अभ्यास | प्रा.डॉ. संजय पाटील<br>वैभव पुंडलिक मावळे | 37-42 |
| 9 | साहित्य म्हणजे जीवनाचा मूल्यनिष्ठ विचार : एक चिकित्सा | प्रा.डॉ.केशव व्यं.पाटील | 43-48 |
| 10 | माझी काटेमुंढरीची शाळा : अध्यापननिष्ठा वाढविणारी कादंबरी | प्रा .बाजीराव कृष्णाजी पाटील | 49-54 |
| 11 | दलित चळवळी (Dalit Movements) | प्रा.डॉ.महेशकुमार पांडुरंग सोनावणे | 55-59 |
| 12 | नवीन शैक्षणिक धोरण एक चिंतन | प्रा.डॉ.मेधा गोसावी | 60-62 |
| 13 | ग्रंथपालाच्या भूमिकेतून माहिती व्यवस्थापन, माहितीचे अर्थकारण व ग्रंथपालाची भूमिका : एक दृष्टिक्षेप | डॉ.संजीवनी श्रीपती कांबळे | 63-67 |
| 14 | सुसंस्कृत आई. रमाई ! एक आकलन | प्रा.डॉ. श्रीहरी रामराव धोंड | 68-71 |
| 15 | आदिवासी समाज आणि संस्कृती एक आकलन | प्राचार्य, डॉ. भास्कर शेळके | 72-74 |
| 16 | महान समाजसेवक : डॉ. प्रकाश आमटे | डॉ. पोपट सिनारे | 75-80 |
| 17 | प्रा. विनोद मोरांडे यांच्या "आत्मसमर्पण" या नाटकातील आदिवासी जाणीवा. | प्रा. राजेश सदाशिव गर्गम<br>डॉ.सुधीर तोलबाजी भगत सर | 81-86 |
| 18 | आदिवासी साहित्य, संकल्पना, प्रेरणा आणि वाटचाल | डॉ.सोपान सुरवसे | 87-91 |
| 19 | ग्रामीण साहित्य स्वरुप आणि आकलन | प्रा.रमेश रिंगणे | 92-95 |
| 20 | हिंदी साहित्य में महिला का स्थान | प्रा. डॉ. उत्तम जाधव | 96-98 |
| 21 | मंगलामुखी' में किन्नर जीवन के विविध आयाम | प्रो. (डॉ.) एकनाथ श्रीपती पाटील | 99-104 |

# ग्रामीण साहित्य स्वरुप आणि आकलन

प्रा.रमेश रिंगणे
मराठी विभाग
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता.गेवराई जि.बीड

आधुनिक मराठी साहित्यामध्ये विविध प्रवाह निर्माण झाले आहेत. या प्रवाहांनी मराठी साहित्य समृध्द केले आहे. काही परिवर्तनेही घडविली आहेत. एकूणच मराठी साहित्य विकसीत होण्यास मदत झाली आहे. त्याचा प्रवासही दिर्घ स्वरूपाचा आहे. मराठी साहित्याला या प्रवाहाने चैतन्य दिले, गती दिली आहे. मुळातच 'ग्रामीण साहित्य'ही संकल्पना एखाद्या प्रदेशांतर्गत जीवनातून निर्माण झालेल्या साहित्याला योजली आहे. त्या साहित्यात त्या-त्या प्रदेशातील वास्तवजीवनाचे प्रतिबिंब पडलेले असते. ग्रामीण साहित्यात ग्रामीण मनाचा, समाजाचा अनेक ताणतणांवासह शब्दरुप झालेला एक सांस्कृतिक ठेवा असतो. ग्रामीण जीवनातील वास्तव जीवन खऱ्या अर्थाने यामध्ये असते.

ग्रामीण जीवनाचे संदर्भ जात्यावरील ओवी लोकगीतात आणि महानुभाव साहित्यात पहावयास मिळतात. परंतु लिखीत साहित्याचा विचार करता म. फुले यांनीच खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्य लेखनाला प्रारंभ केलेला दिसतो. मराठी साहित्यात ग्रामीण साहित्याला म.फुले यांनीच वैचारीक अधिष्टान प्राप्त करुन दिले. 'शेतकऱ्यांचा आसूड' मधून त्यांनी शेतकऱ्यांच्या जीवनाचे प्रभावी चित्रण केले आहे. कृष्णराव भालेकर आणि विठ्ठल रामश्री शिंदे या दोघांनीही शेतकऱ्यांच्या,ग्रामीणांच्या प्रश्नासंबंधी मूलगामी विवेचन केले आहे. ही परंपरा पुढे जेधे-जवळकर,डॉ.आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण यांच्यापर्यंत येऊन पोहचते.

ग्रामीण साहित्याचा काळ हा १९२० नंतरचा सर्वार्थाने महत्वाचा आहे. महाराष्ट्रामध्ये राजकीय आणि सामाजिक स्वरुपाची उलथापालथ सुरु झाली होती. परिवर्तनाच्या दिशा उजळून निघाल्या होत्या. म.गांधीने 'खेड्याकडे चला' हा नारा दिला होता. खरा भारत खेड्यांतच आहे म्हणून खेड्यांचा उध्दार झाला पाहिजे. या दृष्टीने तत्कालीन राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांचे लक्ष खेड्यांकडे गेलेच, पण लेखकांचेही लक्ष त्यांनी वेधले. या सर्व घडामोडींचे मराठी साहित्यातून ग्रामीण जीवनाचे दर्शन घडले पाहिजे या जाणीवेने आणि शहरी वाचकांच्या कुतूहलजागृतीसाठी वेगळ्या वाटा शोधण्याच्या हेतूनेही ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविण्यास प्रारंभ झाला होता. प्र.ह. खाडिलकर यांच्या 'स्वाधीन संसार' (१९२७) ही कादंबरी खेड्याचा उध्दार कसा करता येईल हे सांगण्याचा प्रयत्न करणारी आहे. भा.वि.वरेकरांची 'सात लाखातील एक' (१९३०) ही ग्रामीण कादंबरी शेतकरी जीवन व खेड्यांमधून शहरात आलेल्या कामगार वर्गाविषयी आहे. रा.शा.पाटील यांची 'सीता' (१९३१) व वाळींबे तथा रामतनय यांची 'मोहित्याची मंजुळा' (१९३१) या कादंबऱ्या ग्रामीण जीवनाची तेथील वास्तवाची तोंड ओळख करुन देणाऱ्या आहेत. या कालखंडातील

...तेक ग्रामीण लेखक हे मनाने मध्यमवर्गीय जीवन प्रमाण मानणारे होते. त्यांच्याजीवन प्रेरणांचे आरोपण ग्रामीण साहित्याच्या निर्मितीवर होऊन ग्रामीण जीवनातील पात्रे , त्या प्रेरणांनुसार वर्तन करु लागली. ...हरी पांढरपेशी वर्गाला आवडतील असेच ग्रामीण विषय हाताळली जात होती. ग्रामीण साहित्याला ...हिर्मुख कृती प्राप्त झाल्यामुळे व ग्रामीण चळवळीने जोर दिल्यामुळे,एक दबाव निर्माण करीत मराठी साहित्यात 'ग्रामीण साहित्य' हे ग्रामीण समाजाचे साहित्य म्हणून मान्यता मिळाली. त्यामुळे मराठी साहित्याचा वाचक वर्ग निर्माण झाला. ग्रामीण साहित्य ही फक्त शिक्षितांची मरासदारी होऊ लागली. शिक्षितांचे जीवन, त्यांचा समाज,त्यं ाचे प्रश्न,त्यांचे जगणे, त्यांच्या समस्या, भावभावना यानांच फक्त ग्रामीण साहित्यात स्थान मिळू लागले. सोलापूरच्या भाषणामध्ये प्रा.रावसाहेब कसबे म्हणाले होते. "ग्रामीण माणूस ...रंजामी निद्रेतून आता हळूहळू जागा होतो आहे." ते खरेच आहे. कारण ग्रामीण जीवनाच्या उद्‌वस्तीकरणाला प्रारंभ होऊन आता शंभर वर्ष उलटून गेली. यंत्र युगाच्या अगमनाबरोबरच संपूर्ण ग्रामीण व्यवस्था उद्‌वस्त झाली. याचे प्रभावी चित्रण म.फुले यांनी केलेले आहे. ताराबाई शिंदे यांनी आमची सगळी कारागिरी बुडली याची नोंद केली आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने हा काळ ग्रामीण साहित्याच्या परिवर्तनाचा समजला जातो.

१९४०-४५ नंतरचा काळ म्हणजे दुसरे महायुध्द संपल्यानंतरचा काळ-सामाजिक आर्थिक स्थित्यंतराचा काळ. एकूणच समाज जिवनाची घडी विस्कटलेली होती. सर्व निष्टा.मूल्य, श्रध्दा, नीतिकल्पना इ. ची पडझड झालेली होती. या पडझडीतूनच मानवी अस्वस्थतेचे नवे कोंब साहित्यात उमटू लागले. महायुध्दामुळे निर्माण झालेल्या समस्या, वर्णद्वेष,वर्गद्वेष याचा परिणाम साहित्यावरही झाला. त्यामुळे साहित्यात नवकविता,नवकथा लेखक निर्माण झाले. हे लेखक मानवी मनाच्या दर्शनाला,त्यांच्या ताणतणावाला महत्व देऊन लेखन करु लागले. ग्रामीण जीवनातील विषमता, दैन्य,अज्ञान,अंधश्रध्दा, ग्रामीण माणसांची ...ची प्रियता नाहीशी करुन त्यांच्यात आत्मभान निर्माण करण्यासाठी लेखन होऊ लागले.

१९६० नंतर ग्रामीण महाराष्ट्राचे स्वरुप अतिशय वेगाने बदलत गेले. ग्रामीण भागात सर्व प्रकारची जनसंपर्क माध्यमे येऊ लागली. शिक्षणाचे लोण ग्रामीण भगापर्यंत पोहचले. तालुक्याच्या टिकाणी शाळा,महाविद्यालये निघाली. त्यामुळे शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली. नविन नविन तरूण मुले,मुली शिकल्यामुळे लिहीयला लागली. लेखक म्हणुन नावारूपाला येऊ लागली. त्यामुळे शेतीत राबणारे हात साहित्यात येऊ लागले. त्यांच्या हातातुन कसदार साहित्याची निर्मीती होऊ लागली. आपली दुःखे आपणाच मांडली पाहिजे असे त्यांना वाटायला लागले. जिवनातील कितीतरी नव नवे अनुभव, नव्या जाणीवा त्यांच्या लेखनात अभिव्यक्त होऊ लागल्या. ज्या जीवनाचं दर्शन मराठी साहित्याला घडलं नव्हतं ते जीवन त्यांच्या विविध अंगानिशी ग्रामीण साहित्यात येऊ लागले.

१९८० ते १९९० च्या दशकात ग्रामीण साहित्य चळवळीने अनेक नव्या लेखकांना लिहीते केले.

परिणामतः ग्रामीण जीवन आणि जाणीवा साहित्यातून मोठ्या प्रमाणात येऊ लागल्या. ग्रामीण माणसाच्या शोषनमुक्तीसाठी महाराष्ट्रात घडणाऱ्या घटनांचे पडसाद या लेखनातून उमटू लागले. सुरेश पुरूषोत्तम बोरकर, मोहन पाटील, रविंद्र टाकुर, राजन गवस, आण्पासाहेब खोत, तानाजी पाटील, होळकर, प्रकाश घोडके, नारायण सुमंत इ. लेखकांच्या लेखनाने नवे वळण घातले. परंपरागत जीवनापेक्षा बदलते ग्रामीण जीवन हा त्यांच्या लेखनाचा विषय बनला. त्यामुळे ग्रामीण साहित्याचा हा विविधांगांनी विकसीत होत गेलेला दिसतो.

**काव्य वाङ्मय :-** `ग्रामीण कविता` हा वाङ्मय प्रकार `पॅस्टोरल पोएट्री` वरूनच मराठीत आला. वर्ड्सवर्थ `सॉलिटरीरीपर` सारख्या कवितेवरून बेतलेल्या ग्रामीण कविता अनेक कविनी लिहील्या आहेत. ग.ल.ठोकळ तर थॉमस हार्डी पासून प्रेरणा मिळाल्याचे कबूल करतात. चंद्रशेखरांनी `सफोक मिरॅकल` चे काव्य चमत्कार हे रूपांतर केले. म्हणजे आरंभीची ग्रामीण कविता ही इंग्रजी वरून प्रेरणा घेतना दिसते.

**डॉ.वासुदेव मुलाटे यांच्या मते -** `ज्या कवितेत ग्रामीण जीवनाचे, ग्रामीण माणसांच्या जाणिवांचे, सुख दु:खांचे, आनंदोल्लोसाचे, अडीअडचणीचे व समस्यांचे चित्रण केलेले असते त्याला ग्रामीण कविता असे म्हणता येईल.` अशा या ग्रामीण कवितेत खेडं, खेड्याशी संलग्न असलेलकृषिजीवन, खेड्यातील जीवनाचे दु:ख, हर्ष दारिद्र्य, रूढी-परंपरा, संस्कृती इ.चा अंतर्भाव अपेक्षित आहे. अशा या ग्रामीण कवितेचा उगम पाहताना प्रथम लोकसाहित्यात सापडतो. लोकसाहित्य आणि संतसाहित्यामध्ये ग्रामीण साहित्याच्या खुणा सापडतात. म.फुले व त्यांच्या सहकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडली. कवि चंद्रशेखर, कवि गिरीश, यशवंत,ग.ह.पाटील, ग.ल.टोकळ, बहिणाबाई, आनंद यादव, फ.मं.शहाजिंदे, महानोर, भालेराव, नारायण सुमंत, राजा मुकूंद, माधव थोरात, श्रीकांत देशमुख, जगदिश कदम, प्रकाश शिंदे इ.कवींनी शेतकरी जीवनाचे चित्रण आपल्या कवितेतून केले आहे. आशय व अभिव्यक्ती दोन्हीच्या बाबतीत जीवनाशी अत्यंत प्रामाणिक राहणारी त्यांनी कविता लिहिली.

**कादंबरी वाङ्मय :-** ग्रामीण समाजाचे वास्तव चित्रण मोठ्या प्रमाणात कादंबरीत पाहायला मिळते. मराठीतली पहिली कांदबरी `यमुनापर्यटन` ही पहिली स्वतंत्र कादंबरी असली तरी `बळीबा पाटील` (१८८८) व टिकेकरांची `पिराजी पाटील`(१९०३) या कादंबऱ्या शेतकरी जीवन चित्रणाच्या दृष्टीने महत्वाच्या आहेत. प्र.ह.खाडिलकरांची `स्वाधीन संसार` (१९२७) ह्या कादंबरीत खेड्याचा उध्दार कसा होईल हे सांगण्याचा प्रयत्न अत्यंत भावूकपणे केला आहे. नंतर भा.वि.वरेरकरांची `सात लाखातील एक` (१९३०), रा.श.पाटील `सीता`(१९३१), वाळींबे यांची `मोहित्याची मंजुळा`(१९३१), रामतनयांचे `खेड्याचा उध्दार`(१९३६), वि.वा.हडप यांची `अन्नदाता उपाशी`(१९३७) या सुरूवातीच्या कादंबरीने मराठी कादंबरी लेखनात महत्वाची भूमिका बजावली. १९२० ते १९४० या कालखंडातील कादंबऱ्याचे स्वरूप हे खेड्याच्या उध्दारातच एकूण देशाचा उध्दार आहे. या जाणीवेने लेखन केले. ग्रामीण जीवनातील सर्व स्तरा

...मता. दु:ख, दैन्य दुर करण्यासाठी लेखन झालेले आहे. र.वा.दिघे यांची `पाणकळा` (१९३९), सराई ...४३), म.भा.भोसले यांची `समरांगण`(१९४१), द.र.कवटेकर `रेशमाच्या गाठी` (१९४२), श्रीराम अत्तरदे `सावलीच्या उन्हात` (१९४०), भिसे यांची `जंगलातील ...` (१९४०), विठ्ठल चंदरकरांची `महापूर`(१९४३) इ.ग्रामीण लेखकांनी खेड्यातील भयान, विद्रुपवास्तव, ... यांचे प्रत्यकारी चित्रण केले आहे. १९४५ नंतर लेखकांचा कल हा ग्रामीण जीवनाचे भेदक व ...निष्ठ चित्रण करण्याकडे असलेला दिसून येतो. `गावगुंड`, टिणगी, उघड्या जगात, एका आईची ..., घसरगुंडी, एल्गार, हद्दपार, रथचक्र, आकाशाची फळे या कादंबऱ्या महत्त्वाच्या आहेत. १९६० नंतर ... साहित्यातून ग्रामीण जाणीवा मोठ्या प्रमाणात व्यक्त होऊ लागल्या.

१९४०-४५ नंतर मराठी कथेत अमुलाग्र बदल झाला. ग्रामीण जीवनाचे अस्सल दर्शन घडविणारी ... निर्माण होऊ लागली. या काळात ग्रामीण कथा स्थूलतेकडुन - सूक्ष्मतेकडे वळली. ग्रामीण माणसांचे ..., त्यांचे बोलणे, चालणे, वागणे, त्यांच्या भोवतीचा परिसर, त्यांची संस्कृती याचे उत्तम आकलन ...लेली कथा लिहू लागले. व्यंकटेश माडगूळकर यांनी `माणदेशी माणस`, `हस्ताचा पाऊस`, `गावाकडच्या ...टी` या कथा संग्रहातून ब्राम्हण, मराठा, महार, मुसलमान, वडार अशा सर्व स्तरावरील जाती जमातीचे ...ण केले आहे. तर शंकर पाटील यांनी आभाळ,ख् ऊन, धिंड, भेटीगाठी या सारख्या कथामधून शेतीत ...णारे, शेतीची काळजी करणारी व खऱ्या अर्थाने कृषक जीवन जगणारी माणसे त्यांच्या कथेतून आले ...हेत. बी.रघुनाथ, द.मा.मिरासदार, रणजीत देसाई, बाबा पाटील, आनंद यादव, द.ता.भोसले, बोराडे, ...ा कलाल, भास्कर चंदनशिव, मुकुंद गायकवाड, शंकर पाटील, खोत, गणेश आवटे यांनी ग्रामीण कथा ...आपल्या परीने समृध्द केली आहे.

अशा प्रकारे मराठी ग्रामीण साहित्यात काव्य, कथा, कादंबरी, आत्मचरित्र अशा सर्वच वाङःमय ...रातून ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. नव्या पिढीतल्या ग्रामीण लेखकांनीही वास्तवाचे भान ठेऊन ...न केले आहे. बदलत्या काळाच्या संदर्भात आज नविन समस्या निर्माण होत आहेत. या समस्या, ...तणाव सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाच्या आहेत. या सर्वांकडे ग्रामीण लेखकानं डोळसपणे बघायला ..., त्यांच वास्तव चित्रण मराठी वाचकांसमोर आणले पाहिजे. तेव्हाच खऱ्या अर्थाने ग्रामीण साहित्याची ...वळ यशस्वी झाली असे आपणास म्हणता येईल.

संदर्भग्रंथ :-

ग्रामीण साहित्य :- स्वरूप आणि शोध - डॉ.नागनाथ कोत्तापले, प्र.स्वरूप प्रकाशन औरंगाबद. जानेवारी २००७

ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास :- प्रा.चंद्रकुमार नलगे - प्र.सुरेश एजन्सी पुणे. सप्टेंबर १९९६

ग्रामीण साहित्य :- चळवळ आणि निर्मीती -रा.रं.बोराडे- संस्कृत्ती प्रकाशन. फेब्रुवारी २०१०.